प्रदुषित नदयातील प्रदुषण रोखण्यासाठी स्वतंत्र सनियंत्रण दलाची बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे दि १६/०७/२०१९ संपन्न झाली. सदर बैठकीत खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| अ क्र | कृती दलाचे सदस्य व नगरपालिका प्रशासन सदस्य | नाव/पदनाम/ईमेल | सही |
|---|---|---|---|
| १ | मा. जिल्हाधिकारी तथा त्यांचे प्रतिनिधी | | |
| २ | जिल्हा पोलिस अधिक्षक यांचे प्रतिनिधी | एस.डी. ओव्हाळ | |
| ३ | म.प्र.नि. मंडळ यांचे प्रतिनिधी | | |
| ४ | विधी सेवा प्राधिकरण यांचे प्रतिनिधी | अॅड जीवन पेडगावकर | |
| ५ | मुख्याधिकारी न.पा. गंगाखेड | नानासाहेब कामठे | |

सर्वप्रथम श्री जयंत कदम, उप प्रादेशिक आधिकारी, यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. जिल्हाधिकारी, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात केली यांनी दि. १३/१२/२०१८ शासन निर्णय व समितीच्या कार्यक्रमाची माहिती सादर केली समिती सदस्यांनी या समितीमध्ये निमंत्रीत सदस्य तहसिलदार, गंगाखेड व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना पुढील बैठकीस निमंत्रीत करण्यात आदेशित केले. मा. जिल्हाधिकारी यांनी सदर प्रदुषित पाण्यामध्ये गंगाखेड परिसरातील विहीत पट्टया बाबत विचारणा केली यावर श्री. जयंत कदम यांनी सोमेश्वर मंदीर, रावेर पर्यंत गोदावरी नदी मी प्रथम क्र. १ मध्ये असल्याचे सांगितले. गोदावरी नदी काठी परभणी जिल्हयातील गंगाखेड शहर असून या शहरातील विना प्रक्रीया सांडपाणी नाल्याद्वारे गोदावरी नदी पात्रात मिळते त्यावर मा. जिल्हाधकिारी यांनी, गंगाखेड नगर परिषद मुख्याधिकारी यांनी सद्य स्थितीत काय उपाय योजना व पुढे करण्यात येत असलेल्या कृती आराखडा बद्दल विचारणा केली . यावर श्री कामटे यांनी सांगितले की, यापूर्वी नदी संवर्धन अंतर्गत पर्यावरण विभागात कृती आराखडा सादर केलेला आहे त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी पुढील बैठकीस कृती आराखडा बद्दल केलेल्या अंमल बजावणी बाबत सविस्तर माहिती सादर करण्यासाठी आदेशित केले. मा. जिल्हाधिकारी यांनी नदीच्या दोन्ही बाजूस वृक्ष लागवड करण्या बाबत नगर परिषद यांना सूचित केले व म.प्र.नि.मंडळ व विधी अधिकारी यांना सदर काम बघण्यासाठी आदेशित केले श्री. कदम यांनी सदर म.प्र.नि.मंडळ, केंद्रीय प्रदुषण मंडळाकडे प्रारूप नदी प्रदुशित पट्टया बाबतचा कृती आराखडयाची प्रत समितीस सादर केली. मा. जिल्हाधिकारी, व नगर परिषद यांनी शहरातील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणीसाठीचा कालबद्ध कार्यक्रम सादर करणे बाबत सूचित केले यावर मुख्याधिकारी यांनी असे सांगितले की, सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सदर सांडपाणी सनियंत्रण यंत्रणा मार्च २०१९ पूर्वी करणे बाबत उप प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी, परभणी